## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ५०१/२०२२/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शांताराम कृष्णा तिटकारे<br>रा. प्लॉट नं. ४, रुपामाता नगर,<br>सावेडी, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>मुख्याध्यापक,<br>सिध्दार्थ विद्यालय, संगमनेर,<br>ता. संगमनेर, जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>कार्यकारी निबंधक (संस्था),<br>बहुजन शिक्षण संघ अहमदनगर,<br>मार्फत सिध्दार्थ विद्यालय, संगमनेर,<br>ता. संगमनेर, जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – ०८/१२/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. ११/०१/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी प्रथम अपिलावर कोणताही निर्णय झाला नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.०८/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी वगळता सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. १८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०२०-२०२१ या कालावधीतील श्री. जालिंदर मारुती डगळे प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या वर महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ मधील कलम ३, १८ आणि १९ चे उल्लंघन केले म्हणुन शिस्तभंग विषयक केलेल्या कारवाईबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक १६/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थेतील प्रयोगशाळा सहाय्यक श्री. डगळे जालिंदर मारुती यांचे अनुषंगाने वेळोवेळी सदर संस्थेस पत्र पाठविल्याचे दिसुन येते. यावरुन श्री. डगळे व तुमचा कौटुंबिक वाद असल्याचे निदर्शनास येत आहे. तुमच्यामध्ये असलेल्या घरगुती वादासाठी तुम्हाला योग्य त्या न्यायालयामध्ये दाद मागून न्याय घेण्याचा पुर्णपणे कायदेशीर अधिकार आहे, असे कळविले होते. याशिवाय श्री. डगळे (त्रयस्थ पक्ष) यांनी दिनांक २३/०७/२०२० च्या पत्रान्वये मुख्याध्यापक सिध्दार्थ विद्यालय यांना असे कळविले आहे की,

श्री. शांताराम तिटकारे हे कौटुंबिक वाद विवादातुन शाळेकडे अनावश्यक पत्र व्यवहार करीत आहे तरी त्यांना माझ्या संबंधीत कोणतीही माहिती देण्यात येऊ नये.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. २९/११/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसुन येत नाही.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही संस्थेतील प्रयोगशाळा सहाय्यक श्री. जालिंदर मारुती डगळे यांच्याशी संबंधीत असल्याने आणि त्रयस्थ पक्षाने त्यांची कोणतीही माहिती अपिलार्थीस देण्यात येवू नये असे कळविले असल्याने त्यांना माहिती दिलेली नाही. असे स्पष्ट केले असुन माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ८ (त्र) मधील तरतुदी नुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उध्दभवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागविलेली माहिती, पुरविता येत नाही, असे ही स्पष्ट केले आहे. सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे निर्देशान आनुण दिले की, अपिलार्थी श्री. शांताराम तिटकारे यांनी वादविवादातून श्री. जालींदर डगळे यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याची विनंती शाळेला केली होती. तथापि, श्री. डगळे यांनी कोणतीही गैरवर्तन केले नसुन त्यांचे काम उत्कृष्ठ असल्याने त्यांच्या वर बेकायदेशीर पणे कार्यवाही करणे योग्य ठरत नसल्याने त्यांच्या वर कोणती ही कार्यवाही करण्यात आलेली नाही. दरम्यान श्री. डगळे सिध्दार्थ विद्यालयात अतिरीक्त ठरल्यामुळे त्यांना डी.जी. सराफ विद्यालय संगमनेर या शाळेत समायोजित करण्यात आले आहे. त्यानुसार त्यांना या शाळेतुन दिनांक २२/११/२०२१ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाने माहिती पुरविण्यास दिलेला नकार आणि माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम कलम ८ (त्र) मधील तरतुदी विचारात घेऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली नाही, असे दिसुन येते. अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची आणि शाळेने केलेल्या शिस्तभंग विषयक कार्यवाहीची माहिती मागितली आहे. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने S.L.P. (Civil) No.२७७३४/२०१२ गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग व इतर या प्रकरणी दि.०३/१०/२०१२ रोजी दिलेला निर्णयातील कार्यात्मक भाग खालील प्रमाणे आहे.

Copies of all memos issued to the third respondent show cause notices and orders of censure/punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of section 8(1) of the RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and the employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the disclosure of which has no relationship to any public activity or public interest. On the other hand, the disclosure of which would cause unwarranted invasion of privacy of the individual.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आणि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (त्र) मधिल तरतुद विचारात घेता वैयक्तिक माहिती ही व्यापक, सार्वजानिक हित गुंतलेले आहे अशी बाब वगळता देणे बंधनकारक नाही. तसेच कर्मचाऱ्याविरुध्द सुरू असलेल्या शिस्तभंग विषयक कार्यवाहीची माहिती देखील देणे बंधनकारक नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ५०१/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./५०१/२०२२/अहमदनगर ओ-** 229 **दिनांक-** 22/02/2023